16

# चिद्‌विलासवाद : एक चिंतन

**प्रा. डॉ. भगवान दिरंगे,**
*मराठी भाषा व वाङ्मय विभाग प्रमुख,*
*लालबहादूर शास्त्री महाविद्यालय परतूर,*
*ता. परतूर, जि. जालना.*

चिद्‌विलासवाद हा भारतीय वेदान्त दर्शनातील एक महत्वाचा सिध्दांत आहे. अर्थात चिद्‌वादी तत्वज्ञानाची मांडणी जगात प्राचीन काळापासून अनेक तत्ववेत्त्यांनी केली आहे. चिद्‌वादाला इंग्रजीमध्ये Idealism या नावाने संबोधतात. जगताचे मूळकारण जड नाही, ते चैतन्यरुप, चिद्‌रुप आहे असे हा सिध्दांत मानतो. विश्वाचे मूलभूत वास्तव हे चैतन्यरुप, अविनाशी आहे. असा विश्वास या तत्वविचारात व्यक्त केलेला आहे.

" जगताचे आद्यतत्व किंवा स्वरुप चिद्‌रुप आहे. अथवा जड नाही असे माननारा सिध्दांत. या सिध्दांताच्या मते मूलभूत वास्तव हे मन अथवा चैतन्यरुपी असते. चिद्‌वादाच्या पुढे विविध शाखा झाल्या. वस्तूनिष्ठ किंवा विषयसापेक्ष चिद्‌वादाला वास्तववाद मान्य आहे म्हणजे तो जडवस्तूंचे अस्तित्व मान्य करतो, परंतु तो निसर्गवाद अथवा यथार्थवाद अमान्य करतो म्हणजे जडद्रव्यापासून मन किंवा चैतन्य निर्माण झाले असे मत तो अमान्य करतो. मानवी बोधनेच्या पलिकडे जड पदार्थांचे अस्तित्व आहे हे आत्मनिष्ठ किंवा विषयसापेक्ष चिद्‌वाद अमान्य करतो. याप्रमाणे चिद्‌वाद हा वास्तववाद आणि यथार्थवाद या दोहोंच्याही विरोधात आहे. " १

चिद्‌वादा विषयी अशा प्रकारचे स्पष्टीकरण वाङ् मयीन संज्ञा - संकल्पना कोशामध्ये आढळते. चिद्‌वादी सिध्दांत वास्तववाद नाकारतो म्हणजे वास्तववादाने व्यक्त केलेला तत्वविचार नाकारतो. वास्तववादी तत्वप्रणालीमध्ये बाह्य जगातील पदार्थांचे अस्तित्व मूळात या विश्वात आहेच. त्या पदार्थांचा तुम्हाला अनुभव येवो अथवा न येवो. बाह्य जगातील पदार्थांचे अस्तित्व त्यांच्या विषयीच्या विचारावर अवलंबून नसून ते स्वतंत्रपणे अस्तित्वात असतात. ज्ञेय पदार्थांचे अस्तित्व ज्ञात्यावर अवलंबून नसते असा वास्तववादी तत्वविचाराचा अर्थ आहे. या उलट चिद्‌वाद म्हणतो ज्ञात्यावरच बाह्य पदार्थांचे अस्तित्व अवलंबून आहे.

' सच्चिदानंद ' ही संज्ञा चिद्‌वादी विचारवंत नेहमी चर्चेत घेत असतात. ' आयुष्याच्या कारणे सच्चिदानंद पदवी घेणे ' यातच मानवी जीवनाची सार्थकता आहे. असा संताचा अभिप्राय आहे. सत् - चित् - आनंद ही तीन पदे आत्म्याची वाचक आहेत. आत्मा ही मूळ

वस्तू सत् - चित् - आनंद स्वरुप आहे. या आत्मवस्तूची क्रीडा म्हणजे विलास हाच चिद्विलास होय. अव्यक्त ईश्वराला प्रकट व्हावे वाटले, बहुस्याम व्हावे वाटले आणि तो विश्वरुपाने प्रकट झाला. असा विचार उपनिषदांनी व्यक्त केला आहे.

" आत्मा चिन्मात्र म्हणजे निखळ ज्ञानरुप आहे. जग हेही ज्ञानघन आहे. ज्ञानरुप आत्मतत्व जगत्रुप ज्ञान प्रकाशित करते. प्रकाशच प्रकाशक होतो. प्रकाश्य आणि प्रकाशक यातले द्वंद्व नाहीसे होते. ज्ञानेश्वरीत चिद्विलासवादी दृष्टीकोन व्यक्त झाला आहे. अशेष विश्व हे आत्मतत्वाचा विलास आहे. असे सांगणारा ज्ञानेश्वरांचा चिद्विलासवाद ही आत्मवादाचीच एक मांडणी होय. " २

ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीमध्ये अनेक सुंदर दृष्टांताद्वारे या तत्वाचे स्पष्टीकरण केले आहे.

**" माझेया विस्तारलेंपणाचेनि नावे । हें जगचि नोहे आवघें ।**
**जैसे दुध मुरालें स्वभावे । तरिं तेचि दहीं ।। ६४ ।।**
**किंवा**
**का बीजचि जाहलें तरु । अथवा भांगारचि अळंकारु ।**
**तैसा मज एकाचा विस्तारु । तें हें जग ।। ६५ ।। " ३**

ज्या प्रमाणे स्वभावत:च विरजलेले दूध दही म्हटले जाते, त्या प्रमाणे माझ्या नामरुपाने होणाऱ्या विस्ताराचेच जग हे नाव नाही काय. म्हणजे परब्रह्माच्या नामरुपाने होणाऱ्या विस्ताराला जग हे नाव आहे असे ज्ञानेश्वर म्हणतात. " किंवा बीजच झाड होते, अथवा सोनेच अलंकार होते, असे हे जग म्हणजे माझ्या एकाचाच विस्तार होय. ज्या प्रमाणे प्रथम बीज ही एक वस्तू असते व मग त्यापासून खोड, फांद्या, पाने, फुले, फळे असा विस्तार होतो, पण त्या सर्वांसह एक झाडवस्तूच असते. किंवा सोन्याचे अलंकार अनेक असले तरी त्या अलंकारासह सोने हीच एक वस्तू असते, त्या प्रमाणे परब्रह्माचा अनेकरुपाने विस्तार झाला तरी त्याचे अद्वैतरुप एकवस्तूतत्व नाहिसे होत नाही. म्हणजे जग हे नाव परब्रह्माच्या नामरुपात्मक विस्ताराला असल्यामुळे मुळात जग हे परब्रह्माचे निरुपाधिक किंवा अनध्यस्त विवर्त कार्य आहे. असे हे कार्य ' अत: सदात्मना सर्व व्यवहाराणां सर्वविकाराणां च सत्यत्वम ' परब्रह्माशी एकरुप आहे म्हणूनच ते सत्य आहे. असा अभिप्राय छांदोग्य उपनिषदात आचार्यांनी नोंदविलेला आहे. " ४

साहित्य मिमांसकांच्या चर्चेतही चिद्विलासवादाचे तत्व महत्वाचे मानले गेले आहे. केवळ पौर्वात्य साहित्यमिमांसकच चिद्वादाचा विचार करतात असे नाही. प्लेटो पासून कांट, हेगेल आदी तत्वचिंतक चिद्वादी तत्वप्रणालीचे स्पष्टीकरण करतात. विश्वचैतन्यवादी मिमांसकांनी तर प्राचीन भारतीय चिद्वादी तत्वप्रणालीच्या समकक्ष विचार व्यक्त केलेले आहेत. " विश्वचैतन्यवादयांनी सर्वविश्व एकाच चैतन्याचा आविष्कार आहे असे मत मांडले. हे विश्वचैतन्य वेगवेगळया रुपात सर्व चराचर सृष्टीत संचारत असते. जेथे जेथे नियमितता आहे तेथे तेथे या चैतन्याचा आविष्कार पाहावयास सापडतो. जडसृष्टीतही नियमितता असल्याने तिच्यातही या चैतन्याचा आविष्कार सापडल्यास नवल नाही. सृष्टी एक नियमित समष्टी आहे. " ५

या वरुन आपण असे म्हणू शकतो की, जड सृष्टीत सुध्दा विश्वचैतन्य व्याप्त आहे. असे मत विश्वचैतन्यवादयांनी व्यक्त केले आहे. तात्पर्य जड सृष्टीच्या अस्तित्वाविषयी सर्व सामान्य माणसाचे जे मत आहे त्याला चिद्वादयांचा विरोध नाही. ते अस्तित्व चेतनविरहीत, स्वतंत्र आहे या मताला त्यांचा विरोध आहे. पारमार्थिक चैतन्यावादयांच्या मते जड सृष्टी नाहीच तो एका अभास आहे, माया आहे, चैतन्याशिवाय दूसरे काहीच नाही. " हेगेलच्या मते अस्तित्वात असलेले सर्व काही एकाच चैतन्याचा म्हणजेच केवळ चैतन्याचाच नानाविध आविष्कार आहे. " ६ अध्यात्मवादी तत्वचिंतकांनी केलेले चिद्विलासाचे निरुपण आणि हेगेलाचे प्रतिपादन यात विलक्षण साम्य आहे.

**संदर्भ :**


१. वाङ्मयीन संज्ञा - संकल्पना कोश :
संपादक : प्रभा गणोरकर, वसंत आबाजी डहाके व इतर.
चिद्वाद : पृष्ठ क्र. २१२, २१३

२. तत्रैव

३. ज्ञानेश्वरी (गुढार्थ दीपिका) :
संत ज्ञानेश्वरी : गीता प्रेस गोरखपूर
पृष्ठ क्र. २९२

४. तत्रैव : पृष्ठ क्र. २९४

५. सौंदर्य मिमांसा : रा.भा. पाटणकर
पृष्ठ क्र. १०८

६. सामाजिक शास्त्रातील संज्ञा सिध्दांताचा कोश :
तत्वज्ञान : डॉ. बी.आर. जोशी
पृष्ठ क्र. १८२